# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्र. मुमाआ/नों.क्र.२११२०२/२१/अ.क्र.४३७/२५/०१**
**क्र. मुमाआ/नों.क्र.२११११९/२१/अ.क्र.४३८/२५/०१**

**Miss Ayman Shaikh**
Room No. 1, Chawl No. 16, Hayat Mohd Chawl,
Parsiwadi, Ghatkopar (W) Mumbai – 400086.

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (रस्ते) पू.उ. एम/पूर्व विभाग**
बृहन्मुंबई महानगरपालिका उप प्रमुख अभियंता (रस्ते) पू.उ. यांचे कार्यालय,
परिवार इमारत, ५वा मजला,न.भु.क्र. ११९/ब, अण्णाभाऊ गोडबोले मार्ग,
कांजूरमार्ग (पूर्व) मुंबई - ४०००४२

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (रस्ते) पूर्व उपनगरे एन व एम/पूर्व विभाग,**
बृहन्मुंबई महानगरपालिका उप प्रमुख अभियंता (रस्ते) पू.उ. यांचे कार्यालय,
परिवार इमारत, ५वा मजला,न.भु.क्र. ११९/ब, अण्णाभाऊ गोडबोले मार्ग,
कांजूरमार्ग (पूर्व) मुंबई - ४०००४२

**<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०८.०५.२०२५</u>**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपीलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ०४.१२.२०२० | १०.१२.२०२० | ११.०१.२०२१ | - |

अपीलार्थी यांनी माहितीच्या अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ०४.१२.२०२० रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी "Works of Yogesh Construction AE-95 Cross Road gali no. 2 mankhurd" याबाबत माहितीची मागणी केली आहे.

सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दि. १०.१२.२०२० रोजी "अपीलार्थी यांना अपेक्षित असलेल्या माहितीचे शुल्क भरल्यानंतर माहिती देण्यात येईल", असे उत्तर दिले आहे.

त्यानंतर अपीलार्थी यांनी दि. ११.०१.२०२१ रोजी कलम १९(१) नुसार प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे "माहिती प्राप्त झाली नाही", असे कारण नमूद करुन प्रथम अपील अर्ज दाखल केला आहे. त्यावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाची सुनावणी घेतली नसून आदेश पारित केले नाही.

तद्नंतर अपीलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) नुसार आयोगाकडे दि. १८.०३.२०२१ रोजी "जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती दिली आहे", असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

सदर द्वितीय अपीलावर आज दि. ०८.०५.२०२५ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपीलार्थी उपस्थित आहे. विद्यमान जन माहिती अधिकारी व विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी कोणतीही सूचना न देता अनुपस्थित आहेत.

अपीलार्थी यांनी असे विशद केले की, जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (रस्ते) पु.उ. एम/पूर्व विभाग यांच्याकडे माहिती शुल्क भरले होते. परंतु सदर माहिती अपूर्ण प्राप्त झाली आहे.

सदर प्रकरणी अपीलार्थी यांनी मागणी केलेली माहिती, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ४ (१) ख नुसार कार्यालयीन संकेतस्थळावर माहिती अद्यावत करणे बंधनकारक आहे.

या संदर्भात मा. मुख्य माहिती आयुक्त यांनी दि. २९.०४.२०२५ रोजी "सर्व सार्वजनिक प्राधिकरणांनी त्यांच्याकडे प्राप्त होणारे सर्व माहिती अधिकार अर्ज आणि सदर अर्जांना देण्यात आलेले उत्तर व माहिती (माहिती अधिकार कायदा अंतर्गत सूट असलेल्या ठिकाणी वगळता) सर्व सार्वजनिक प्राधिकरणांच्या संकेतस्थळावर नागरीकांना सुलभरितीने शोधता येईल अशा पद्धतीने शोध सुविधा (key word search) देऊन स्वयंप्रेरणेने प्रकट करावी", असे निर्देश दिले आहेत.

सदर प्रकरणी अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती ही शासकीय निधी, व त्याचा विनियोग यांचेशी संबंधित असल्यामुळे ती माहिती अधिकार अधिनियमातील कलम ४(१) अन्वये उघड करणे बंधनकारक आहे. ही बाब लक्षात घेता, अपिलार्थी यांचा प्रस्तुत व्दितीय अपील अर्ज मंजूर करण्यात येत आहे. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (रस्ते) पु.उ. एम/पूर्व विभाग यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने कलम २(च) नुसार उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस तात्काळ व सॉफ्ट प्रतीमध्ये विनामुल्य प्रदान करण्यात यावी. या निर्देशासह प्रस्तुत व्दितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

**१. वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**
**२. अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Maharashtra

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : ०८.०५.२०२५**

**( राहुल पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**